Historicity Research Journal
Volume 2 | Issue 2 | Oct 2015

ISSN:- 2393-8900

Research Article

संयुक्त महाराष्ट्र चळवळ व मराठी शाहिरांचा सहभाग

शांताराम शेलार

सांराश :

आज आपण महाराष्ट्र राज्याची निर्मिती कशी झाली. याविषयी जर विचार मंथन केले, तर त्या संदर्भात काही प्रमाणात पार्श्वभूमी पाहणे आवश्यक आहे. 1 मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. 'महाराष्ट्र' हे राज्य भाषावार प्रांतरचनेच्या तत्त्वानुसार निर्माण झाले आहे. त्यामध्ये सर्व मराठी भाषिक प्रदेशांचा अंतर्भाव करणेत आला आहे.

प्रस्तावना

'संयुक्त महाराष्ट्र राज्य स्थापन करण्यात यावे' या स्वरुपाची मागणी तशी विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासूनची आहे. ऐतिहासिक व भौगोलिकदृष्ट्याा प. महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा विभागातील मराठी भाषिक लोक तीन वेगवेगळ्याा राज्यामध्ये यापूर्वी विभागले गेले होते. हे सर्व विभाग एकत्र आणून, सोयीचे प्रशासन निर्माण व्हावे. अशी या पाठीमागे भूमिका होती.

भाषावार प्रांतरचना कशासाठी करावी, यासाठी वेगवेगळ्याा स्वरुपाचे विचार मंथन झाले आहे. त्यापैकी समान भाषासूत्र समतावादी संस्कृती, समान आर्थिक दर्जा, क्रमवार जोडलेले भूविभाग, भौगोलिकदृष्ट्याा महत्त्वाचे मानले गेले आहेत. एक भाषासूत्र हे एकात्मता व लोकशाही मूल्याला बळकटी देणारे आहे. त्यानुसार राष्ट्राचा विकास घडवून आणणे योग्य ठरते.

भाषावार प्रांतरचना :–

भारतामध्ये 1818 नंतर ब्रिटीश राजवट आली. ब्रिटीश राज्यकर्त्यांनी राज्य कारभाराच्या सोयीसाठी भारतीय प्रदेशाचे निरनिराळ्याा प्रांतात विभाजन केले. परंतु यावेळी प्रांताची स्वतंत्र रचना करताना निश्चित कोणत्याही मूलभूत तत्त्वांचा आधार घेतलेला नव्हता. त्यामुळे ब्रिटीश काळातील प्रांतरचनेत कसलीही तात्त्विक आणि मार्मिक भूमिका ठरविलेली नव्हती, त्यामुळे त्यामध्ये कोणत्याही प्रकारची एकसूत्रता निर्माण झाली नाही. त्यातूनच कोणत्या तरी विशिष्ट तत्त्वांचा , घटकांचा, आधार घेत देशातील प्रांतांची पुनर्रचना करण्यात यावी, अशा स्वरुपाची मागणी पुढे आली.

भारतामध्ये अनेक प्रकारच्या भाषा बोलल्या जातात. तसेच प्रत्येक भाषिक समुहाचे, जनतेचे वास्तव्य विशिष्ट आणि भौगोलिकदृष्ट्याा एका सलग प्रदेशात आहे. त्यामुळे भाषा हा घटक प्रमाणभूत मानला जावून , प्रांतिक पुनर्रचनेत भाषेचा आधार घेण्याचा विचार पुढे आला. भाषेच्या आधारावर प्रांताची स्वतंत्रनिर्मिती करावी व प्रत्येक भाषेचे वेगळे राज्य स्थापन करावे. असा विचार काही विचारवंतानी व्यक्त केला. लवकरच अशा अर्थाची मागणी निरनिराळ्याा प्रदेशातील लोकांच्याकडून करण्यात येऊ लागली. अशा प्रकारच्या मागणीलाच भाषावर प्रांतरचनेची मागणी , असे म्हटले गेले.

महाराष्ट्र राज्यामध्ये 1947 नंतर जनतेकडून संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीची चळवळ सुरु झाली. 'पूर्वीच्या मुंबई प्रांताऐवजी मराठी भाषिकांचे वेगळे महाराष्ट्र राज्य निर्माण व्हावे'. अशी मराठी बांधवांची संघटित स्वरुपाची तीव्र अशी मागणी होती. भाषांवार प्रांतरचनेसाठी अनेक राजकीय नेते अनुकूल होते. त्या आधारावर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने इ.स.

1920 मध्ये 'नागपूर' येथील अधिवेशनात या मागणीला प्रथम मान्यता दिली. तेथून पुढील काळात काँग्रेसने वार्षिक अधिवेशनांच्या कार्यक्रमामधून वेळोवेळी या मागणीचा पुनरुच्चार केला. इ.स. 1927 मध्ये ब्रिटीश सरकारने 'सायमन कमिशन' ची नियुक्ती केली. पण त्यामध्ये एकही भारतीय सदस्य नसल्याने या समितीला जनतेकडून कडाडून विरोध झाला. त्याविरुद्ध असंतोष पसरला. जनतेचा असंतोष दूर करणेसाठी इंग्रज सरकारच्यावतीने असे सांगितले गेले की, '' भारतातील सर्व पक्षांच्या नेत्यांनी घटनात्मक प्रश्नासंबंधी एकमताने काही विधायक सुचना केल्या, तर त्याचा विचार केला जाईल.''

नेहरु अहवाल :–

ब्रिटीश सरकारचे हे स्पष्टीकरण भारतीय नेते व जनतेचे विचारात घेऊन त्याकरिता त्यांनी भारताच्या भावी राज्यघटनेचा आराखडा तयार करण्यासाठी 'पंडित मोतिलाल नेहरु' यांच्या अध्यक्षतेखाली एक सर्वपक्षीय नेत्यांची निर्णय समिती स्थापन केली.. या समितीने जो अहवाल सादर केला, त्यास 'नेहरु अहवाल 'असे संबोधले जाते. हा अहवाल इ.स. 1928 प्रसिध्द झाला. यामध्ये भाषांवार प्रांतरचनेच्या मागणीचा अंतर्भाव करणेत आला आहे.

इ.स. 1938 च्या मराठी साहित्य संमेलनात ' मराठी भाषिकांचे वेगळे महाराष्ट्र राज्य निर्माण व्हावे' अशा आशयाचा ठराव स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकरांनी मंजूर करुन घेवून, मराठी बांधवांची इच्छा प्रकट केली. यानंतर 1946 साली बेळगावच्या साहित्य संमेलनात गं.त्र्यं. माडखोलकरांनी , याच मागणीचा ठराव मांडला होता, व तो मंजूरही केला गेला.

भाषावार प्रांतरचनेच्या मागणीच्या विचारासाठी आणि स्वरुप ठरविणेसाठी 'पंडित नेहरु', 'वल्लभभाई पटेल', 'पट्टाभि सीतारामय्या यांचे कमिशन नेमले गेले. फाजलअली कमिशनद्वारा या संदर्भात विचार मंथन सुरु झाले. दुर्दैवाने एखादा दुसरा अपवाद वगळता, या कमिशनमध्ये मराठी भासिकाबद्दल द्वेष असणाऱ्या आणि मराठी माणसाबद्दल गैरसमज असणाऱ्यांचाच जास्त भरणा केलेला होता. त्याचा परिणाम असा झाला की, मुंबईसह महाराष्ट्र राज्य या मूळ मागणीला बगल देत भांडवलदारांच्या दबावाला बळी पडून 'केंद्रशासित मुंबई', 'द्विभाषिक राज्य', 'त्रैभाषिक राज्य', असे तोडगे या कमिशनद्वारा सुचविले जाऊ लागले. काहीही करुन निव्वळ मराठी भाषा बोलणाऱ्यांचे राज्य निर्माण होऊ द्यायचे नाही. उलट मराठी माणसाचे खच्चीकरण करावयाचे, असाच विचार केंद्रातील सत्ताधारी नेते करु लागले. त्यामुळे सहजासहजी आपली मागणी मान्य व्हायची नाही, त्यासाठी तीव्र स्वरुपाचा एकजुटीचा लढा द्यावा लागेल. असा विचार मराठी बांधवांच्या मनात निर्माण झाला.

संयुक्त महाराष्ट्र समिती :–

इ.स. 1955 मध्ये ऑक्टोबर महिन्यापासून संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे रुपांतर जनआंदोलनात झाले. या आंदोलनात कोणतीही संघटित शक्ती नव्हती. तो फक्त मराठी जनतेचा प्रक्षुब्ध भावनांचा उत्स्फूर्त असा आविष्कार होता. यावेळी महाराष्ट्रातील काँग्रेसच्या नेत्यांनी या चळवळीतून आपले अंग काढून घेतले, तरी महाराष्ट्रातील सर्व विरोधी पक्षांचे नेते मात्र संयुक्त महाराष्ट्रावादी भुमिकेशी ठामपणे चिटकून राहिले, यावेळी आंदोलनाची तिव्रता अधिकाधिक वाढतच राहिली. पक्षातील काही प्रमुख नेत्यांनी जन आंदोलनात सुसूत्रता करावयाची आवश्यकता प्रतिपादन केली. त्या दिशेने प्रयत्न करुन त्याचेच दृश्य स्वरुप म्हणजे संयुक्त महाराष्ट्र समितीची झालेली स्थापना होय. 6 फेब्रुवारी 1956 रोजी थोर विचारवंत व नेते 'एस.एम.जोशी ' यांनी महाराष्ट्रातील संयुक्त महाराष्ट्रावादी पक्ष आणि मान्यवरांची अपक्ष व्यक्तीची एक परिषद 'टिळक स्मारक मंदिर' पुणे येथे घेतली गेली. 'केशवराव जेधे' या परिषदेचे अध्यक्ष होते. या परिषदेत संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी आणि मराठी जनतेच्या न्याय मागणीच्या एकमुखी सामुदायिक स्वरुपाचे नेतृत्व निर्माण करुन देण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यावेळी या समितीने काही उद्दिष्ट्यो निश्चित केली होती. ती पुढीलप्रमाणे

उद्दिश्ट्यो :–

1) भाषावार प्रांतरचनेला प्राधान्य देणे.
2) मराठी भाषिकाचेच एकात्म आणि सलग राज्य प्रस्थापित करणे.
3) लोकांचा सभेमध्ये सहभाग असणे, आवश्यक मानणे.
4) समाजवादी दृष्टिकोनाला महत्त्व देणे.
5) महाराष्ट्रातील आर्थिक , सांस्कृतिक व सामाजिक जीवनाची सहकारी तत्त्वावर अधिकार ठेवून उभारणी करणे.

सुरुवातीच्या काळात संयुक्त महाराष्ट्र समितीत महाराष्ट्रातील कॉग्रेस पक्षाव्यतिरिक्त सर्व राजकीय पक्ष सामील झाले होते. त्यामध्ये 'शेतकरी कामगार पक्ष' , 'प्रजासमाजवादी पक्ष' , 'कम्युनिष्ट पक्ष' , 'शेड्युल्ड कास्टस् फेडरेशन ' , 'लाल निशाण गट ' , 'हिंदू महासभा ' , 'जनसंघ ' , इत्यादींचा समावेश होता. 'एस. एम.जोशी ' , 'भाई एस.

ए.डांगे ' , 'आचार्य अत्रे ' , 'क्रांतीसिंह नाना पाटील ' , 'प्रबोधनकार ठाकरे ' , 'सेनापती बापट ' , 'ना.ग. गोरे ' , 'जयंतराव टिळक ' , 'उध्दवराव पाटील ' , 'भाई दाजिबा देसाई ' , 'दादासाहेब गायकवाड ' , इ. समर्थ व झुंजार नेत्यांनी संयुक्त महाराष्ट्र समितीच्या नेतृत्वाची धुरा नेटाने वाहिली.

मराठी शाहीर :–

या लढ्यात तेवढ्याच ताकदीने मैदानात उतरले ते महाराष्ट्रातील रणमर्द मराठी शाहीर . संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला जसजशी गती प्राप्त झाली. तसतशी 'शाहीर आत्माराम पाटील', 'शाहीर आण्णभाऊ साठे ', 'शाहीर गवाणकर ' , 'शाहीर नामदेव कापडे ', 'शाहीर शरद मुठे ', 'कविवर्य वसंत बापट ','कवी सुरेश भट ','डॉ. सुधीर फडके ' आदिंच्या लेखणीला क्रांतीयुक्त तेजाची धार चढत गेली.

मराठी शाहिरांनी मराठी माणसांचा मराठी भाषिकांचा द्वेष करणाऱ्या आणि स्वतंत्र महाराष्ट्र निर्मितीस विरोध करणाऱ्यांचे वाभाडे लेखणीद्वारे काढले. या मराठी शाहिरांनी संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढला. महाराष्ट्रात लोकचळवळीला वणवा पेटविला. या वातावरणातील अग्नीच्या ज्वालांनी दिल्लीकरांचे आसन डळमळू लागले, वितळू लागले.

शाहिरांनी तत्कालिन वातावरणाची तिव्रता प्रखर शब्दात आपल्या काव्यरचनेत मांडली. त्याद्वारे जनतेचे प्रबोधन केले. त्यामुळे हा लढा लढण्याचे बळ सामान्यजनतेला प्राप्त होऊ लागले. परिणामी महाराष्ट्र राज्यनिर्मितीस विरोध करणाऱ्याविरुध्द प्रचंड जनक्षोभ निर्माण झाला, आणि त्याची प्रचिती 1957 सालच्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत आली. जनतेने सत्ताधारी पक्षाच्या अनेक मातब्बर उमेदवारांना पराजयाची धूळ चारली. यावेळी समितीतील उमेदवार प्रचंड बहुमतांनी निवडून आले. या लढ्यामध्ये जेवढे समितीचे नेते सहभागी झाले होते, तेवढ्याच प्रमाणात शाहिरांचाही सिंहाचा वाटा होता.

संस्कृती व समाज :–

प्रत्येक संस्कृतीचा स्वतंत्र एक असा वेगळा रंग असतो. संस्कृतीचे प्रतिबिंब साहित्यात उमटलेले असते. साहित्यिकांची जडणघडणही सामाजिक स्तरावर व तेथील पर्यावरणावर , संस्कारावर अवलंबून असते. गाव, शहर , महानगर, प्रांत, राष्ट्र, देश, जग असा प्रवास हा जगाच्या नकाशावर आपणास पहावयास मिळतो. नकाशातील घटकांनुसार व्यक्ती ही काही प्रसंगी काही ठिकाणी विशिष्ट हेतूनुसार प्रवास करु इच्छिते. वेळप्रसंगी असा प्रवास आवश्यक असतो. अशा प्रसंगातून व्यक्तीच्या मनावर तेथील संस्कृतीचा परिणाम नकळतपणे होत असतो. संस्कृतीच्या वेगवेगळेपणाच्या संदर्भात प्रांत, देश व त्यातील भिन्नता ठळकपणे दिसून येते. निसर्गातील अनुकूल, नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर , भौगोलिक पर्यावरण , भौतिकतेची विविधता व अनुकूलता, खनिजे व साधन संपत्ती इ. मुळे राष्ट्राची प्रगती होते. यातून औद्योगिकता वाढीस लागते. त्यामधून सामाजिक व राजकीय प्रगती होत असते. राष्ट्राची विकासाकडे वाटचाल होत असते. राष्ट्र प्रगतीपथावर असेल तरच तेथील जनसामान्य लोक हे समाधानी व सुखी असू शकतात. त्यासाठी प्रत्येक राष्ट्र हे आपले अस्तित्व टिकवून ठेवते. 'जीवन हे जन्म आणि मरण ' या तत्त्वामध्ये बांधलेले आहे. त्यानुसारच प्रत्येकाचे धर्मविषयक , राष्ट्रविषयक तत्त्वचिंतन मर्यादित झालेले दिसते. ''एका स्वतंत्र राष्ट्राची संस्कृतीच्या अनुषंगाने झालेली प्रगती, ही नैसर्गिक व भौतिकदृष्ट्या वेगळी असू शकते. प्रत्येक राष्ट्र त्या अस्मितेच्या भावबंधनात, बांधिलकी मानते'' असे म्हटले जाते. उदा. 'जशी माती, तशी नीती' , 'जशी खाण, तशी माती. त्याचप्रमाणे ' , ' जसे राष्ट्र, तशी व्यक्ती' असते. त्या व्यक्तीचा व्यक्तिमत्त्वाचा डामडौलही वेगळा असतो. त्याचे आचरण , राहणीमान वेगळे असते. प्रत्येक राष्ट्र हे संस्कृतीनुसार आचरण करते. रुढी व परंपरा श्रध्दा या जीवन प्रणालीला गतिमान करीत असतात. त्यानुसार राष्ट्रीय मन घडत राहते. हे जरी असले तरी ही राष्ट्राराष्ट्रात काही समानता, समता, सलोखा किंवा अंशतः सारखेपणा दिसतो. त्यातूनच एकता, बंधुभाव व मानवता वाढीस लागते.

जो देश स्वतंत्र अस्तित्व टिकवून आहे, तेथे त्या तत्त्वप्रणालीनुसार स्वातंत्र्य प्रस्थापित होवून टिकून राहते. त्या देशाची प्रगती ही अखंडपणे विकासात्मक पध्दतीने वाढीस लागते. उदा. भारत देश स्वतंत्र झाला पण भारतातील इतर घटक राज्ये ही स्वतंत्र आहेत का ? काही प्रांतिक समस्या किंवा राजकीय भेदभावामुळे राष्ट्राच्या एकसंघतेत फूट पडलेली दिसते. भाषा, प्रांत व जनसमुदाय यांच्यातील असमानतेच्या व विषमतेच्या मुद्द्यावरुन मुद्दामच भेदभाव पसरविला जातो. त्या प्रांतात त्या जातीचे, धर्माचे, वंशाचेलोक राहतात, ते लोक जी भाषा वापरतात, बोलतात, अशा लोकांचा एक गट निर्माण होवून तेथे एकजुटीतून एकात्मता निर्माण होते. ही एकात्मता टिकविण्यासाठी सरकारी योजनांचा, भविष्यातील वाटचालींचा ताळमेळ जमणे महत्त्वाचे असते. हा ताळमेळ संयुक्त महाराष्ट्राच्या संदर्भात जमलेला नव्हता, तर विस्कटलेला होता. या विस्कटलेल्या प्रश्नांचा मराठी शाहिरांनी आपल्या विविध आशयाच्या काव्यरचनेतून ज्वलंत स्वरुपाचा आविष्कार प्रकट केला आहे. सर्वसामान्यजनांच्या मनामध्ये संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नांसंबंधी जागृती निर्माण करुन चळवळीला एका अर्थाने प्रेरणा दिली, एक संघपणाला प्रोत्साहन दिले. 'एका प्रांताचे स्वतंत्र विभाग न होता तो प्रांत एकसंघ राहावा', ही भूमिका या शाहिरांची होती. त्यातून आंतरराष्ट्रीय सलोखा व बंधुभाव टिकून राहावा, हा हेतू त्यांच्या काव्यरचनेतून दिसून येतो.

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ही महाराष्ट्रामध्ये मराठी शाहिरांनी अतिशय जोमाने पुढे रेटली. त्यामध्ये महाराष्ट्रासंबंधी 'पोवाडे', 'गीते', 'गोंधळ', 'लावण्या' वगैरेंचा समावेश असलेला दिसून येतो. संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन ज्यावेळी ऐन रंगात आलेले होते, त्यावेळी झुंजारवृत्तीच्या शाहिरांनी पोवाडे व विविध स्वरुपाची राष्ट्रभक्तीची गीते रचली. त्यात 'शाहीर आत्माराम पाटील', 'शाहीर आण्णाभाऊ' , 'शाहीर नामदेव कापडे', 'शाहीर शरद मुठे' वगैरे आणि इतर शाहीरही होते. त्यांनी निर्माण केलेल्या रचनेमध्ये एक प्रकारचा जोश व आवेश दिसून येतो. महाराष्ट्रावर अन्याय होत आहे, याची जाणीव प्रत्येक मराठी माणसाला होत होती. सर्व कविजन संवेदनशील असल्यामुळे त्यांच्या रचना या जनतेला प्रेरणा देणाऱ्या ठरल्या. त्यांनी रचलेली गाणी , पोवाडे लावण्या महाराष्ट्रातील घरांघरातून जाहीर कार्यक्रमाद्वारे प्रसारित झाल्या. महाराष्ट्र देशाचा दर्जा, महत्त्व, संस्कृतीचे संचित इतर देशांना शाहिरी काव्याद्वारे परिचित करुन दिले. ही फार मोठी कामगिरी शाहिरांनी केली आहे.

शाहीर व विचारवंताचा सहभाग , समन्वय व विचार क्रांती :–

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी 'सर्वसामान्यलोक ते सुधारणावादी विचारवंत' यांना ही चळवळ का करावी लागली ? या संदर्भात ऐतिहासिक पार्श्वभूमी आपण लक्षात घेतली पाहिजे. संयुक्त महाराष्ट्र समितीचे सरचिटणीस एस. एम.जोशी यांच्या शब्दात सांगायचे झाल्यास '' हा लढा लक्ष्मीनारायण विरुध्द दरिद्री नारायण'' असा होता. मुंबई शहर हा कळीचा प्रश्न बनलेला होता. 'मध्यप्रदेश', 'हैद्राबाद संस्थान' आणि 'मुंबई इलाखा', यात वाटला गेलेला मराठी प्रदेश , मराठी भाषा बोलणाऱ्यांचा होता. कारण मुंबईभोवतीचा प्रदेश मराठी बोलणाऱ्यांचा होता मुंबईत पाणी, वीज महाराष्ट्रातून येत होती. कारखान्यात श्रम करणारे मजूर मराठीच होते. मुंबईतील मोठे व्यापारी, भांडवलदार ही मंडळी गुजराथी आणि मारवाडी होती. त्यामुळे ह्या मंडळींचा आग्रह मुंबई स्वतंत्र ठेवावी, असा होता. मध्यवर्ती सरकारने 'दार कमिशन' ('फाजलअली', 'कुंजरु' आणि 'पण्णीकर') वगैरे जी कमिशने नेमली, त्यापुढे ह्या मंडळींनी आणि त्यांच्या नेत्यांनी '' आम्हास महाराष्ट्रात राहण्याची भिती वाटते.'' अशा साक्षी दिल्या. असे सांगणे म्हणजे, मराठी माणसांच्या जखमेवर मीठ चोळून अधिक तीव्र वेदना देण्यासारखे होते. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत 'मराठी विरुध्द गुजराथी' असा देखावा निर्माण करण्यावर काही लुच्च्या लोकांनी प्रयत्न केला. परंतु तो हाणून पाडण्यात आला. खरे म्हणजे ' हा लढा आहे रे विरुध्द नाही रे' अशा स्वरुपाचा होता. त्यास कोणतेही प्रांतीय वळण लागू नये, काही अनर्थ घडू नये, त्यातून विध्वंसक व हिंसक गोष्टी घडू नयेत, म्हणून संयुक्त महाराष्ट्र समितीच्या नेत्यांनी प्रयत्न केले. तसेच शाहिरांनी आपल्या काव्यरचनेतून या प्रश्नांना वेगळ्याआंगाने प्रसारित केले. राष्ट्रभक्ती व बंधुभाव, स्वातंत्र्य या मूल्याविषयी त्यांनी आत्मियतेने प्रयत्न केले. मराठी शाहिरी कवितेचा वाङ्मयाच्या इतिहासात लोक साहित्याच्याअंगाने , सांस्कृतिक वाङ्मयाच्याअंगाने विविध संशोधकांनी , अभ्यासकांनी निष्ठापूर्वक अभ्यास केलेला आहे. त्यातून विविध प्रकारचे निष्कर्ष मांडलेले आहेत. 'शिवकाल', 'पेशवेकाल' व आधुनिक कालखंडापर्यंत शाहिरीकाव्याची विपुल प्रमाणात स्वतंत्र ग्रंथरुपाने चर्चा झालेली आहे. पारंपारिक शाहिरीपेक्षा, 'भेदिक व कलगी तुरा' या रचनाप्रकारापेक्षा आधुनिक शाहिरी काव्याचा रचनाबंध हा वेगळ्याा प्रकाराचा आहे. मध्ययुगीन कालखंडातील शाहिरी काव्याच्या प्रेरणा व प्रवृत्ती जशा त्या त्या कालखंडात विविधप्रसंगातून निर्माण झाल्या. त्याप्रमाणे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या संदर्भात घटना, प्रसंग, प्रेरणा , प्रवृत्ती आधुनिक राष्ट्रीय शाहिरीमध्ये प्रकट झालेल्या आहेत.

संयुक्त महाराष्ट्राचा लढा व स्वातंत्र्य चळवळ :–

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ही स्वातंत्र्यलढयाच्या चळवळीचा एक पोटभाग म्हणून कल्पिली जाते. इ.स.1857 ते 1947 पर्यंतची सामाजिक व वाङ्मयीन चळवळ जशी महत्त्वाची मानली गेली, त्याचप्रमाणे राजकीय चळवळीही महत्त्वाच्या मानल्या गेल्या आहेत.

आपण आपल्या देशात लोकांचे प्रतिनिधी निवडून दिले आहेत. लोकांनी लोकांसाठी राज्य निर्माण केले पाहिजे. ही लोकशाहींची मूळ संकल्पना सर्वांनी निर्धाराने रुजविली आहे. लोकशाहीच्या मार्गाने आपण भाषावर प्रांतरचना आणली आहे. आपल्या देशाचा राज्यकारभार कसा चालला आहे, हे सामान्यमाणसाला कळले पाहिजे , म्हणून भाषांवार प्रांतरचना केली आहे. यासाठी आग्रह धरुन झगडून महाराष्ट्र राज्यनिर्माण करुन घेतले. परंतु आपण असा विचार केला पाहिजे की, ''भाषेच्या, धर्माच्या , जातीच्या अभिनिवेशाने आपले राष्ट्र दुबळे होत नाही ना ?'' याविषयी सतत चिंतन केले पाहिजे.

महाराष्ट्र देश हा सामर्थ्यवान होवून व आर्थिक क्षेत्रात उन्नत होवून, उद्योगधंद्यात प्रगतीचा टप्पा कसा गाठेल, या संदर्भात सातत्याने प्रयन्न झालेले दिसतात. आज आपला देश विविध वाद–विवादांनी पोखरलेल्या स्वरुपात नजरेस पडतो आहे. उदा. ब्राम्हण–ब्राम्हणेतरवाद, मराठा–मराठेतरवाद, ओबीसी – ओबीसीएतरवाद, दलित– दलितेतरवाद, अशा प्रकारची तेढ निर्माण झाली आहे. अनेक जनांनी आपल्या स्वतंत्र अशा सेना आणि ब्रिगेडस् निर्माण केलेल्या आहेत. हे सर्व एका भितीपोटी झाले आहे. ह्या विविध सेना त्वरित समाजात स्वखुशीने समाजहिताच्यादृष्टीने विलिन व्हायला पाहिजेत. मराठी माणूस मराठी माणसालाच आज भितो आहे. हे दृश्य दिसता कामा नये . संत रामदासांच्या उक्तीप्रमाणे

''मराठा तितुका मेळवावा
महाराष्ट्र धर्म वाढवावा''

याप्रमाणे आपले ध्येय व उद्दिष्ट असले पाहिजे, हा महाराष्ट्र धर्म केवळ दुसऱ्याची शिदोरी हिसकावून घेण्यासाठी नाही, किंवा इतरांना सतत दहशतीखाली ठेवण्यासाठी असता कामा नये. हे ध्यानात ठेवले पाहिजे.

कविवर्य वसंत बापट यांनी असे म्हटले आहे की,
'' या भारतवासी सारे, या यारे हसरे तारे
तुम्ही सारे आम्हा प्यारे, हा पहा मराठा देश
जरी प्रदेश आमुचा न्यारा , तरी अवघा भारत प्यारा
ढळतो न इथे ध्रुवतारा, हा जग मित्रांचा देश''

कविमनाचा हा एकात्मतेचा, बंधुभाव राखण्याचा संदेश, निर्धार निर्माण करणेस योग्य वाटतो, राष्ट्रास राष्ट्र जोडले पाहिजे, धर्माला धर्म संयुक्तपणे येवून मिळाला पाहिजे. कोणत्याही प्रकारची एकमेकांच्या मनात अंतर्गत तेढ निर्माण होता कामा नये. अशा प्रकारचे उद्दिष्ट संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील शाहिरी काव्यातून दिसून येते.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत कशाचीही पर्वा न करता स्वतःला झोकून देणारे शाहीर निर्धारपूर्वक विविध स्वरुपाची रचना करीत होते. म्हणजेच राष्ट्राचे स्वातंत्र्य व स्वाभिमान पटवून सांगत होते. राष्ट्रीय अस्मितेचे मूल्य, दर्जा प्रतिपादन करीत असताना शाहिरांनी समाजाचे अखंडपणे प्रबोधन केले आहे.

जगातील विविध धर्मपंथाचा अभ्यास करताना आपणास विविध मतप्रणाली जाणवतात. उदा. 'जैन', 'लिंगायत', 'बौध्द', 'ख्रिश्चन', 'मुस्लिम', 'ज्यू' 'पार्शी' इ. धर्मामध्ये ज्या रुढी आणि परंपरा आहेत, त्या परंपरांचा त्या धर्मातील तत्त्वानुसार आचरणपध्दतीचा परिचय घडतो. काही धर्मातील संकल्पना, आशयसूत्रे समान किंवा भिन्न स्वरुपाची असलेली दिसतात. तरीही संशोधक, अभ्यासक, तत्त्वज्ञानी त्या त्या धर्मपंथातील प्रकट झालेली समान मूल्ये व समता, ऐक्य वाढविणारे घटक शोधून ती राष्ट्रहिताच्यादृष्टीने कशी आवश्यक आहेत, या संदर्भात चिंतन मनन केले पाहिजे.

मुंबई व संयुक्त महाराष्ट्र चळवळ :–

प्रत्येक राष्ट्र हे स्वयंभू व प्रगतीच्यादृष्टीने व्यूहरचना करीत असते. एका राष्ट्राचा औद्योगिक विकास, व्यापार हा इतर राष्ट्राला प्रगतीच्या दृष्टीने मार्गदर्शक ठरतो. तंत्रज्ञानातील प्रगती, विज्ञानातील प्रगती, नवी क्षेत्रे, नवे संशोधन, नवी परिमाणे, संगणकाची नवी निरिक्षणे, विकासात्मकदृष्टीने केलेले प्रयत्न इ. प्रकारचे प्रयत्न राष्ट्राला प्रगतीपथावर घेवून जात असतात.

भारत देशाच्या शेजारील देश हे कशाप्रकारे आपले व्यवहार सिध्द 'लहान राष्ट्र' करतात. त्या देशातील धर्माचा, भाषेचा, साहित्याचा प्रभाव किती प्रमाणात समाजहिताच्यादृष्टीने महत्त्वाचा ठरतो. त्या देशातील इतर घटकराज्ये आपल्या जीवन पध्दतीमध्ये योग्य तो अपेक्षित बदल घडवून आणतात. त्यानुसार दैनंदिन व्यवहार, उपक्रम राबवितात, त्यामध्ये काही अडथळे आल्यास त्यावर मात करुन प्रगतीचा मार्ग मोकळा करतात. केवळ धर्म, जात, पंथ इ. ची उद्दिष्ट्ये डोळ्यासमोर ठेवून सर्वांगीण प्रगती साध्य होवू शकत नाही. त्यासाठी सर्वात्मक संदेश व समानता याविषयी चिंतनकरुन त्याचा उपयोग राष्ट्रहिताच्यादृष्टीने करणे, आवश्यक असते.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या संदर्भात 'मुंबई ही महाराष्ट्रात जावू नये' असे पंडीत नेहरुंना वाटत होते. 'मौलाना आझाद', 'पंडीत गोविंद वल्लभपंत' आदि त्यांच्या सहकाऱ्यांचेही तसेच मत होते. मराठी कॉंग्रेसजनांची त्यामुळे फार विचित्र अशी परिस्थिती झालेली होती. त्यातील नेत्यांना 'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झाला पाहिजे' असे वाटत होते. परंतु दिल्लीच्या नेत्यांना असे ठासून सांगण्याची कोणत्याही नेत्यांची हिंमत होत नव्हती. त्यामुळे हे कॉंग्रेसचे मराठी प्रांतातील पुढारी महाराष्ट्रात तेवढे गर्जना करीत, भाषणे देत होती. दिल्लीला गेल्यावर मात्र तोंड न उघडता कारभार करीत असत. हा त्यांचा ढोंगीपणा, बेगडीपणा मराठी जनतेने ओळखला होता. त्यामुळे हे सर्वनेते जनतेपासून दूर गेलेले होते. इ.स. 1946 मध्ये स्थापन झालेली सर्वपक्षीय 'संयुक्त महाराष्ट्र परिषद', तिचे अध्यक्ष 'शंकरराव देव' यांनी बरखास्त केली. 'एस.एम.जोशी' यांनी पुढाकार घेवून सर्व विरोधीपक्षांची एकजूट घडवून 'संयुक्त महाराष्ट्र समिती' स्थापन केली, आणि नेतृत्वहिन झालेल्या मराठी जनतेला खऱ्या नेतृत्व दिले. त्यानंतर मात्र हे आंदोलन अहिंसेच्या आणि सत्याग्रहाच्यामार्गाने चालू राहिले. संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना झाल्यानंतर एकहि हिंसक घटना घडली नाही. त्यापूर्वी मात्र द्विभाषिक सूत्र जाहिर झाल्यानंतर लोकांचा आकस्मिक असा उद्रेक झाला. ह्या संधीचा फायदा घेवून तत्कालीन कॉंग्रेसचे नेते मोरारजी देसाई व त्याचे सरकार यांनी महाराष्ट्रात 105 आणि अहमहाबादेत 15 व्यक्तींना गोळीबारात ठार केले. समितीच्या नेतृत्वाखाली 45000 लोकांनी सत्याग्रह केला. प्रतापगडावर पंडीत नेहरु 'छत्रपती शिवाजी महाराज' यांच्या पुतळ्याचे उद्घाटन करायला जात असताना त्यांच्या वाटेलर वाईपासून पाजगणीपर्यंत 50000 स्त्री, पुरुष नागरिकांनी तीव्र स्वरुपाची निदर्शने केली. ''संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे!'' ही एकच घोषणा त्या वेळेला आसमंतात दुमदुमली. त्यावेळी आपल्यावर व्दिभाषिक लादण्यात आले होते. या वस्तुस्थितीचे दर्शन 'शाहीर आत्माराम

पाटील' यांनी आपल्या कवनाव्दारे घडविले आहे, ते असे –

'' द्विभाषिकांचा दुतोंडी कावा
आम्हाला आहे पुरता ठावा
साडेतीन कोटी सिंहाचा छावा
पकडाया मांडलाय पिंजरा नवा.''

अशी तीव्र स्वरुपाची भावना लक्षात घेता, त्यावेळची परिस्थिती किती गंभीर होती, हे लक्षात येते. ह्या पिंजऱ्यात फक्त मराठी लोक सापडले नाहीत तर गुजराथीही सापडले. यावेळी गुजराथी लोकांचीही मनःस्थिती बदलली. यावेळी सामान्य गुजराथी माणूसही म्हणू लागला की ''मुंबई ही महाराष्ट्राला मिळालीच पाहिजे.'' अशा प्रकारे राष्ट्रीय एकात्मतेची भावना लोकांच्यामनामध्ये निर्माण झाली, शाहिरांनी निर्माण केली.

ऐतिहासिक मूल्यः–

'संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ' या घटनेला इतिहासामध्ये अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. 1947 ला भारतदेश स्वतंत्र झाला आणि लोकांचे स्वप्न साकार झाले. भारतामध्ये विविधराज्ये अस्तित्वात आली. छोटी छोटी संस्थाने खालसा झाली. भाषा, प्रशासकीय सोय, लोक मानस या त्रिसूत्राच्याआधारे भारतात विविध राज्यांना स्वायता मिळाली, मग या परिस्थितीत महाराष्ट्र कसा अपवाद असेल?

भाषावार, प्रांतवार रचना करण्यासाठी आयोग नेमला गेला. त्या संदर्भातील अहवाल आला आणि महाराष्ट्रात एकच वादळ उठले. संयुक्त महाराष्ट्र चळवळ अस्तित्वात आली. संयुक्त महाराष्ट्र एकीकरण समिती अस्तित्वात आली. लेखक, कलावंत, वर्तमानपत्राचे संपादक, सामान्यलोक, राजकीय पक्ष या सर्वांनीच संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न पाहिले. ते स्वप्न 'याची देही, याची डोळा' अस्तित्वात आणण्यासाठी 105 हुतात्म्यांचे रक्त सांडले. त्या लढ्यातील रक्तरंजीत कहाणी मराठी शाहिरांनी वर्णन केली आहे. 'संयुक्त महाराष्ट्र चळवळ' ही भारताच्या स्वातंत्र्योत्तर इतिहासातील व महाराष्ट्राच्या राजकीय व सांस्कृतिक इतिहासातील अत्यंत महत्त्वाची घटना मानली जाते. 1 मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. परंतु हे राज्य अस्तित्वात येण्याची अखंड धडपड त्याच्याही अगोदर कितीतरी वर्षे चालूच होती. संयुक्त महाराष्ट्राचा 'मंगल कलश' पूर्णत्वास येण्यासाठी कित्येकांनी प्राणार्पण केले. महाराष्ट्रराज्य निर्माण होण्याच्या अमृत मंथन प्रक्रियेतून जशी काही रत्ने मिळाली, तसेच हलाहलही महाराष्ट्रीयन जनतेने पचविले. यामध्ये विविध धर्म पंथाचे लोक सामिल झाले होते. उदा. मराठी जनतेबरोबर गुजराथी, उर्दू, हिंदी, तेलगू भाषिकही उत्स्फूर्तपणे सामील झाले होते. त्यामुळे महाराष्ट्र राज्याचीनिर्मिती या सर्वांच्यादृष्टीने जीवन मरणाचा लढा होता. त्याकडे अभ्यासकांनी संकुचितदृष्टीने पाहून चालणार नाही, तर चौकसपणे पाहिले पाहिजे.

संदर्भग्रंथ

1.संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यास तयार व्हा! – श्रीनिवास सरदेसाई
2.संयुक्त महाराष्ट्राचे महामंथन– ह.रा. महाजन
3.संयुक्त महाराष्ट्राचे महाभारत – शा. लिलाधर हेगडे
4.शाहिरी, पोवाडे, काव्यसंग्रह. शा विजय जगताप
5.लोकयुगीन आत्मशाहिरी भाग 1,2,3– शा आत्माराम पाटील
6.महाराष्ट्र गाथा – संपा. प्र.के.अत्रे.– कुलकर्णी